स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विदयाशाखा अंतर्गत पीएच्.डी (समाजशास्त्र) या पदवी करीता सादर करण्यात आलेला शोध आराखडा.

"कातकरी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास" - विशेष संदर्भ सिंधुदुर्ग जिल्हा

संशोधक

प्रा. लक्ष्मण बापुराव नैताम

एम.ए.एम.फिल.नेट

समाजशास्त्र विभाग

बॅ.बाळासाहेब खर्डेकर महाविदयालय वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग

मो.नं. 9665763078

Email Id : laxmanbnaitam@gmail.com

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सौ.साधना बुरडे

प्रपाठक व विभाग प्रमुख

समाजशास्त्र विभाग

श्री.शिवाजी महाविद्यालय कंधार जि.नांदेड

प्रस्तावना :-

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये समाजव्यवस्थेचे तीन प्रकार आढळून येतात. जसे की १)नागरी २) ग्रामीण ३) आदिवासी. आदिवासी जमाती दूर जंगलामध्ये दऱ्या खोऱ्यात जीवन जगत असतात. त्यांचे राहणीमान इतर समाजापेक्षा साधेपणाचे असते. आदिवासी जमातींची बोलीभाषा इतर समाजापेक्षा वेगळी असते. व इतर समाजासारखे दैवी साधमेला अधिक महत्त्वं देतात.

डोंगराळ दऱ्याखोऱ्यातून जंगलात जाण्यासाठी दळणवळणांची साधने उपलब्ध नसल्यामुळे त्यांची संस्कृती इतर समाजापासून वेगळी राहिलेली आहे. यामुळे निरक्षरता, दारिद्य, अज्ञान या परिस्थितीमुळे आदिवासी जमाती भटक्या अवस्थेत प्राचीन परंपरा चालीरीती, धार्मीक विधी व संस्कृती जतन करून वास्तव्य करीत आहे.

भारतातील आदिवासी जमातीत अनेक पोटजाती आहेत. आदिवासी जमाती व त्यांचे पोट जाती जंगलामध्ये वास्तव्य करून राहत असल्यामुळे त्यांचे बाहेरील जनजीवनाशी संबंध आलेला नाही. निसर्गाचा सान्निध्यात जीवन जगत असताना प्रथम नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव मनावर व भावनांवर होता. त्यामुळे निसर्गाची पुजा करण्यास प्रथम प्राधान्य देतात. कोणत्याही प्रकारचा धार्मिक विधी, परंपरा व रूढीचा आधारेच विधी केले जातात. आदिवासी जमातील संस्कृती टिकविताना परंपरेचा आधार महत्तवपूर्ण मानला जातो.

भारतातील आदिवासींना **"आदिम जमाती"** गिरीजन मुळ निवासी अशी वेगवेगळी नावे आहेत. त्यांना भारतीय राज्यघटनेत **"अनुसूचित जमाती"** या नावाने ओळखले जाते. आदिवासी जमातीची स्वत:ची संस्कृती रिती रिवाज असतात. त्या रिती रिवाजानुसार धार्मिक विधी, रूढी, परंपरा यांचे पालन करणे महत्तवपूर्ण मानले आहे. आदिवासी जमातींचे देव देवता निसर्ग पुजा तसेच जादुवरील विश्वास दिसुन येतो.

दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी जमातीचे देव देवता वेगळे आहेत. उदर निर्वाहासाठी शिकार करणे डिंक गोळा करणे, मध गोळा करणे, औषधी वनस्पती गोळा करून यावर आपण उदर निर्वाह करतात.

आदिवासी जमातीचे प्रामुख्याने बोलीभाषा संस्कृती पारंपारिक पध्दतीचे आढळतात. आदिवासी जमातींचे बाह्य जगाशी जास्त संपर्क नसल्यामुळे हा समाज रूढी पारंपारिकतेवर अवलंबून आहे. त्यामुळे आदिवासी जमाती नागरी समाजापासून वेगळा व अलिप्त आहे.

"१९९१ च्या जनगणना अहवालानुसार भारतातील आदिवासींची लोकसंख्या ६ कोटी ७७ लाख म्हणजे भारतीय लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८% आहे. २००१ च्या जनगणना अहवालानुसार भारतीय आदिवासींचे भारताच्या एकूण लोकसंख्येचे प्रमाण ९ % आहे.

ग्रामीण, शहरी समाजापेक्षा अत्यंत अनोखे, वेगळे जीवन जगणाऱ्यांना आदिवासींची संख्या फारच ३ मी असली तरी ते सर्व भारतभ्र आढळतात. ते ग्रामीण शहरी समाजापासून दूर डोंगराळ भागातून, दऱ्याखोऱ्यातून रानावनातून राहतात. म्हणून त्यांना वन्यजाती, जनजाती, वनवासी गिरीजन म्हटले जाते. रिस्ले, एल्विन, ग्रिगसन, ठक्कर बाप्पा, मार्टीन इत्यादींनी भारतातील आदिवासी हे मूळचे रहिवासी आहेत असे मानले आहे." **१)**

आदिवासी जमातींची व्याख्या :-

१) डॉ. रिव्हर्स :- "आदिवासी समुह हा साधा, सरळ सामाजिक समुह असुन त्यातील सदस्य हे एकाच समान बोलीभाषेचा वापर करतात. आणि युध्द वगैरे समान उदियांच्या पूर्ततेसाठी एकत्र येऊन कार्य करतात.

२) गिलीन आणि गिलीन :- "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा परंतू अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय".

३) डॉ.डी.एन. मुजूमदार :- "आदिवासी म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या फक्त विशिष्टं भुप्रदेशावर निवास करणाऱ्या एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या, विवाह, व्यवसाय या बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणाऱ्या व निश्चित अशा काही मुल्यांची विचारांची जोपासना करणाऱ्या कुंटूंबाचा समुह होय." **२)**

संशोधन पध्दती :-

१) <u>विषयाची निवड</u> :-

कातकरी आदिवासी जमातीचा जीवन मानाचे अनेक अभ्यास झालेले आहेत. पण सिंधुदुर्ग जिल्हयातील कातकरी आदिवासी जमातीचा अभ्यास झालेला नाही. त्यमुळे तेथील कातकरी जमातीचे राहणीमान, बोलीभाषा, वेशभूषा, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय, धार्मिक जीवन इत्यादी समस्यांचा संशोधनातून अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडलेला आहे.

२) <u>अभ्यास विषयाचे शिर्षक</u> :-

"कातकरी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास-विशेष संदर्भ सिंधुदुर्ग जिल्हयातील कातकरी आदिवासी जमातीचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडलेला आहे.

३) <u>संशोधनाची उद्दिष्टये</u> :-

1. कातकरी जमातीचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास करणे.
2. कातकरी जमातीचा धार्मिक सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.
3. कातकरी जमातीची राजकीय यांचा अभ्यास करणे.
4. कातकरी जमातीचा आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजीक समस्या शोधून काढणे.
5. कातकरी जमातीचा सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

४) <u>संशोधन महत्व</u> :-

1. कातकरी आदिवासी जमातीतील कुटूंबाचे दारिद्रयांची वास्तविकता समोर येण्यास मदत होईल.
2. कातकरी जमातीचा जीवन मान उंचावण्यासाठी सरकारने केलेल्या विविध योजनाची माहिती मिळेल.
3. कातकरी जमातीतील कुपोषण उपासमार बेकारी इत्यादी बाबतची माहिती मिळेल.
4. कातकरी जमातीतील आर्थिक, सामाजीक शैक्षणिक समस्थांची माहिती होईल.

५) **<u>गृहीतकृत्ये</u>** **:-**

1. कातकरी जमातीचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे या समाजात दारिद्रयाचे दृष्टचक्र निर्माण झाले आहे.
2. शासनाचा विविध योजनांचा लाभ कातकरी जमातीचा दारिद्रय निर्मूलनासाठी होत आहे.
3. विविध शासकीय योजनांमुळे कातकरी जमातींचा आर्थिक व सामाजिक जीवनमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.
4. कातकरी जमातींचा शैक्षणिक मागासलेपणामुळे या जमातीमध्ये बेरोजगाराचे प्रमाण अधिक आहे.

६) **<u>तथ्य संकलन पध्दती</u>** **:-**

प्राथमिक तथ्य संकलन

१) प्रश्नावली : मुलाखत अनुसुची द्वारे मुलाखत घेणे. प्रत्यक्षात वैयक्तीक, कौटूंबिक,राजकीय, सामाजीक व धार्मिक माहीती मुलाखत अनुसूचीद्वारे घ्यायची आहे.

२) मुलाखत अनूसूची :

३) निरिक्षण :

<u>दुय्यम तथ्य संकलन</u> **:-**

१) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय कार्यालय यांचे वार्षिक अहवाल

२) जिल्हापरिषद सिंधुदुर्ग यांचे वार्षिक अहवाल

३) विविध संकेत स्थळे

४) मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, नियतकालिके व इतर संदर्भिय पुस्तके

५) या पुर्वीचे संशोधन अहवाल

७) **<u>नमुना निवड पध्दत</u>** **:-**

सिंधुदुर्ग जिल्हा कातकरी जमातीचा अभ्यास करण्यासाठी निवडलेला आहे. संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील सरल यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला. तसेच गैरसंभाव्यता नमुना निवड यामधील सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला.

८) **<u>संशोधनाची व्याप्ती व मर्यादा</u>** **:-**

संशोधनाची व्याप्ती सिंधुदुर्ग जिल्हा पुरता मर्यादित असून कातकरी जमातीपूरती मर्यादीत आहे.

९) <u>संशोधनाची मर्यादा</u> :-

संशोधनाची मर्यादा सिंधुदुर्ग जिल्हयातील कातकरी आदिवासी जमाती पुरते मर्यादित आहे.

<u>प्रकरण १ ले प्रस्तावना</u> :

आदिवासी जमाती दुर जंगलामध्ये राहत असतात. आदिवासी जमातीचे राहणीमान साधेपणाचे असते. अनेक विचारवंतानी त्यांना मुळचे रहिवासी म्हटले अनेक विचारवंतांनी व्याख्या केलेली आहे.

<u>प्रकरण २ रे :- संशोधन पध्दती</u>

सदर प्रकरणात कातकरी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यासासाठी वापरण्यात आलेली संशोधन पध्दतीत स्पष्टं करण्यात आलेली आहे. कोणत्याही विषयाचा अभ्यासासाठी निश्‍चित अशा स्वरूपाची योजना तयार करावी लागते. त्याची क्रमवारी लावणे महत्त्वाचे असते. आपल्याला ज्या विषयाचे अभ्यास करावयाचे आहे. त्याची मांडणी उद्दिष्टं पुर्ण असावी लागते.

<u>प्रकरण ३ रे : सामाजीक व कौटूंबिक जीवनाचा अभ्यास करणे</u>

सदरील प्रकरणामध्ये वैयक्तिक व कौटूंबिक माहिती संबंधी विस्तृत मांडणी करण्यात येणार आहे. कौटूंबिक माहितीमध्ये कुटूंब संयूक्त आहे. की विभक्त आहे. तसेच सदस्य कोणते व्यवसाय करतात. या संबंधीची माहितीची मांडणी करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण ४ थे : आर्थिक व राजकीय जीवनाचा अभ्यास करणे</u>

वरील प्रकरणात आर्थिक, राजकीय, सामाजीक आणि धार्मिक माहिती मध्ये जमातीचा प्रमुख कोण असतो. आर्थिक साधने कोणती राजकीय नेता कोण असतो? जातपंचायतीचा प्रमुख कोण असतो? जातपंचायत प्रमुख असतो किंवा नाही. राजकीय सहभाग आहे की नाही या संबंधीची माहीतीची मांडणी करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण ५ वे : धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे :-</u>

सदर प्रकरणामध्ये धार्मिक प्रथा, परंपरा, वृढी, कुलदेवता कोणते आहे कोण कोणते सण साजरे करतात इत्यादी संबंधीची मांडणी करणार आहे.

<u>प्रकरण ६ वे : सारांश, व निष्कर्ष शिफारशी व उपाययोजना :-</u>

<u>संदर्भ ग्रंथ सुची :</u>

१) सामाजिक मानवशास्त्र - लेखक - ए.वाय.कोंडेकर व मंगला पाटील पानं नं. 29, 30
प्रकाशक :- फडके प्रकाशन कोल्हापूर - 416012
प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर 2009

२) सामाजिक मानवशास्त्र : ए.वाय.कोंडेकर व मंगला पाटील पानं नं. 26
प्रकाशक :- फडके प्रकाशन कोल्हापूर - 416012
प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर 2009

संशोधक

प्रा. लक्ष्मण बापुराव नैताम
एम.ए.एम.फिल.नेट
समाजशास्त्र विभाग
बॅ.बाळासाहेब खर्डेकर महाविदयालय वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग
मो.नं. 9665763078
Email Id : laxmanbnaitam@gmail.com

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सौ.साधना बुरडे
प्रपाठक व विभाग प्रमुख
समाजशास्त्र विभाग
श्री.शिवाजी महाविद्यालय कंधार जि.नांदेड